खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# कार्यक्रम व उत्सव समिती

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. २४ मार्च २०२३ रोजी कै. विठ्ठलराव बुट्टे पाटील सभागृहात करण्यात आले. या प्रसंगी भोरच्या अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसन्नकुमार देशमुख, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना भोरच्या अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रसन्नकुमार देशमुख यांनी एकविसाव्या शतकाची आव्हाने पेलण्यासाठी कौशल्याभिमुख, तंत्रज्ञानस्नेही, उपयोजित शिक्षणावर आधारित असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे केजी ते पीजी स्तरावरील शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होणार असल्याचे प्रतिपादन केले.

डॉ. प्रसन्नकुमार देशमुख यांनी सांगितले की आंतरराष्ट्रीय स्तराप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय शिक्षण, पदवी व पदव्युत्तर शिक्षणात लवचीकपणा, बहुविध प्रवेश-निर्गमन, निवड आधारित श्रेयांक पध्दती आणि शैक्षणिक श्रेयांकांची बँक प्रस्तावित केली आहे याचा उपयोग नव्या पिढीमध्ये व्यावसायिक क्षमता व कौशल्य आत्मसात करण्यासाठी होणार आहे. त्यासाठी प्राध्यापकांना नव्या युगाची आव्हाने पेलण्यासाठी स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन केले.

पुण्याच्या नेस वाडिया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासह कार्याधारित शिक्षण घेण्याची संधी मिळणार असल्याचे सांगितले तीन-चार वर्षांचा पदवी पातळीवरचा बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम, त्याच्या श्रेयांक व्यवस्थेची रचना आणि त्यात उपलब्ध करून दिलेल्या पर्यायांचा त्यांनी परिचय करून दिला. कौशल्यविकास, रोजगार संधी व संशोधनावर भर असलेले हे नवे धोरण विद्यार्थ्यांना त्यांचे आयुष्य यशस्वीतेने जगण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणालेया चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला प्रास्ताविक प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे यांनी, सूत्रसंचालन प्रा मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ दिलीप मुळक यांनी मानले

**डॉ. संजय शिंदे**
**कार्यक्रम व उत्सव समिती**

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे आमूलाग्र परिवर्तन

## डॉ. प्रसन्नकुमार देशमुख यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे केजी ते पीजीस्तरावरील शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होणार असल्याचे प्रतिपादन भोरच्या अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसन्नकुमार देशमुख यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सुधार कक्ष आयोजित मराष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०फ या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे उपस्थित होते.

डॉ. देशमुख म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय शिक्षण, बहुविध प्रवेश-निर्गमन, निवड आधारित श्रेयांक पध्दती आणि शैक्षणिक श्रेयांकांची बँक प्रस्तावित केली आहे. याचा उपयोग नव्या पिढीमध्ये व्यावसायिक क्षमता व कौशल्य आत्मसात करण्यासाठी होणार आहे. पुण्याच्या नेस वाडिया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासह कार्याधारित शिक्षण घेण्याची संधी मिळणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. डॉ. दिलीप मुळूक यांनी आभार

My Gramin Edition
Mar 25, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in